# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/10/2023 (सोमवार) सायंकाळ

---

**अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद**
**वाहनासह एकुण ५७३०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त**
**स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई**

दिनांक १६/१०/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कन्हान विभागात पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोलीस स्टेशन खापरखेडा हद्दीतून ट्रॅक्टरने अवैद्यरीत्या विनापरवाना रेती (गौणखनिज) चोरटी वाहतूक होत आहे. अशा मिळालेल्या विश्वसनिय माहिती वरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पिपळा इसापूर रेल्वे क्रॉसिंग जवळ नाकाबंदी केली असता ट्रॅक्टर येतांना दिसल्याने त्यास हात दाखवुन थांबण्याचा इशारा केला. त्यावरून ट्रॅक्टर चालकाने ट्रॅक्टर रोडच्या बाजुला थांबविला तेव्हा सदर ट्रॅक्टरची पाहणी केली असता सदर ट्रॅक्टरचा क्र. MH-40/CA-6845 असा दिसल्याने सदर ट्रॅक्टर चालकास त्याचे नाव गाव पत्ता विचारले असता त्याने आपले नाव मोहन लक्ष्मण तागडे, वय ३५ वर्ष, रा. पिपळा डाग बंगला वार्ड नं. ०१, ता. सावनेर असे सांगितले. त्यानंतर त्यास ट्रॅक्टरच्या मागील डाल्यात काय आहे? असे विचारले असता त्याने रेती (गौणखनिज) असल्याचे सांगितले. तेव्हा त्यास रेती वाहतुकीबाबत परवाना विचारले असता त्याने परवाना नाही असे सांगितल्याने सदर ट्रॅक्टर चालकाचे ताब्यातून ट्रॅक्टरचा क्र. MH-40/CA-6845 किंमती ५,००,०००/—रु. ट्रॉली किंमती अंदाजे ७००००/—रू. व ०१ ब्रास रेती किंमती ३०००/—रू. असा एकुण ५७३०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून पोलीस ठाणे खापरखेडा येथे आरोपीविरूद्ध अप क्र. ६३२/२३ कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हे नोंद करण्यात आलेला असुन पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक बट्टुलाल पांडे, सहायक फौजदार नाना राऊत, पोलीस हवालदार विनोद काळे, राजेंद्र रेवतकर, ईकबाल शेख, पोलीस नायक विरू नरड, संजय बरोदीया यांचे पथकाने पार पाडली.



## घरफोडी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत येनवा ता. काटोल येथे दिनांक १०/०४/२०२३ ते दिनांक १२/१०/२०२३ चे १२.०० वा. १०.०० वा. पावेतो फिर्यादी नामे— ज्ञानेश्वर वासुदेव निकोसे, वय ३९ वर्ष, रा. येनवा ता. काटोल हे कामानिमीत्त कळमेश्वर येथे आपल्या येनवा येथील राहत्या घराला कुलुप लाउन दिनांक १०/०४/२०२३ रोजी १२/०० वा. दरम्यान परिवारासह प्रॉपर्टी डिलींगचे कामानिमित्य राहण्यास गेले असता दि. १०/१०/२०२३ रोजी सकाळी फिर्यादीचे वडिल वासुदेव निकोसे यांनी फोन करून सागीतले कि, तुझ्या घरचे कुलूप तुटलेले दिसत असुन घरातील सामान अस्तव्यस्त पडलेले आहे असे सांगीतले फिर्यादीच्या घरातील सॅमसंग कंपनीची जुनी वापरती एलईडी टिव्ही किंमती १०,०००/— रू जुने एच पी कंपनीचा गॅस सिलेंडर शेगडी किंमती ३०००/— रू जुने वापरते इडली पात्र किंमती ३००/—रू व ब्लॅकेट ६ किंमती २०००/— रू व जुनी लोखंडी टिन किंमती ५००/— रू व वापरलेले कुकर जर्मनी किंमती ३००/— रू. असा एकुण किंमती १६,१००/— रूपयाचा मुद्देमाल अज्ञात चोरटयाने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/५५० पवन वाघमारे मो. नं. ९८३४२८१४०१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर